**RNI No. MAHBIL /2009/36619**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

**वर्ष १२, अंक ५९]** **गुरुवार, जुलै २३, २०२६/श्रावण १, शके १९४८** **[पृष्ठे ४, किंमत : रुपये ११.००**

**असाधारण क्रमांक ८९**

### प्राधिकृत प्रकाशन

**उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर क्र.३, ठाणे यांजकडून**

**अधिसूचना**

क्रमांक उजि/भूसं/मेट्रो-३/ऐरोली-काटई रस्ता/२०२५.– ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (ज्याचा उल्लेख पुढे "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) च्या कलम ३ च्या खंड(इ) च्या द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (या पुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड(झेड अ) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल;

आणि, ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड(छ) अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, ठाणे उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर क्र.३, ठाणे, यांस पद निर्देशित केले आहे;

आणि, ज्याअर्थी, **महाराष्ट्र शासन राजपत्र** असाधारण भाग एक-कोकण विभागीय पुरवणी, असाधारण क्रमांक ७८ दिनांक ०७/०७/२०२४ अन्वये उक्त अधिनियमाचे कलम १०क अन्वये सार्वजनिक भागीदारीखालील प्रकल्पांसह पायाभूत सुविधा प्रकल्प, ज्यात जमिनीची मालकी राज्य शासनाकडे विहित असण्याचे चालू राहील. अशा सदर प्रकल्पास उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोन व तीन यांच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देण्यात आली आहे. त्यामुळे या प्रकल्पासाठी सामाजिक प्रभाव निर्धारण करण्याची आवश्यकता उरलेली नाही;

आणि, ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाची नियुक्ती करण्याची तरतूद ठेवली आहे.

आणि, त्याअर्थी, यासोबत जोडलेल्या अनुसूची एकमध्ये दर्शविलेली जमीन (यापुढे जिचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत "ऐरोली-काटई रस्ता" या प्रकल्पाच्या कारडेपो या प्रकल्पासाठी आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते (प्रकल्पाच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये दिलेले आहे) आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम(१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित

करण्यात येते की, उक्त जमिनीची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत "ऐरोली-काटई रस्ता" या प्रकल्पाच्या या सार्वजनिक प्रयोजनासाठी जमिनीची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येते की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (४) अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही;

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यांस विशेष परिस्थितीत, लेखी कारणे नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल ;

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम(५) अनुसार, जिल्हाधिकारी, भूमि अभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचेदेखील घोषित करीत आहेत.

सदर अधिसूचनेद्वारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याचे कायद्याचे ११ चे उप-कलम(०१) खाली अधिसूचित करणेत आले आहे. त्याविरुद्ध आक्षेप नोंदविण्याचे असल्यास प्रारंभिक अधिसूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर क्र.३, ठाणे यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविणेत येतील.

**अनुसूची-एक**

**जमिनीचा तपशील**

**तालुका कल्याण, जिल्हा ठाणे**

| अ. क्र. (१) | गावाचे नाव (२) | सर्व्हे नंबर (३) | हिस्सा नंबर (४) | ७/१२ वरील क्षेत्र (५) | संपादनासाठी आवश्यक क्षेत्र (६) |
|---|---|---|---|---|---|
| १ | काटई | २०/५/१पै | ३०/५/अ | ०.४५५० | ०.०३३३ |
| २ | काटई | १२२ | १२२ | १.३३०० | ०.१४१० |
| ३ | काटई | २८/१पै | २८/१ | ०.०१५० | ०.००८० |
| ४ | काटई | २८/२ पै | २८/२पै | ०.३२४० | ०.०१७५ |
| ५ | काटई | २९/१/१पै | २९/१/अ | ०.२०२० | ०.०९४० |
| ६ | काटई | ३०/२पै | ३०/२ | ०.०९९० | ०.०१६५ |
| ७ | काटई | ३१/१ | ३१/१ | ०.१५४० | ०.१११० |
| ८ | काटई | ३१/२ | ३१/२ | ०.३३९० | ०.२५३० |
| ९ | काटई | ३२/२/१ | ३२/२/१ | ०.२५३० | ०.०१३५ |
| १० | काटई | ३२/२/२ | ३२/२/२ | ०.१९३० | ०.०५७० |
| ११ | काटई | ३२/२/३ | ३२/२/क | ०.१६९० | ०.०१४० |
| १२ | काटई | ३२/३ | ३२/३ | ०.२०७० | ०.२०७० |
| १३ | काटई | ३३ | ३३ | ०.२४३० | ०.१०२८ |
| १४ | काटई | ३५ पै | ३५ पै | ०.१०६० | ०.०९०० |

| अ. क्र. (१) | गावाचे नाव (२) | सर्व्हे नंबर (३) | हिस्सा नंबर (४) | ७/१२ वरील क्षेत्र (५) | संपादनासाठी आवश्यक क्षेत्र (६) |
|---|---|---|---|---|---|
| १५ | काटई | ३६/१ पै | ३६/१पै | ०.३७७० | ०.०२१० |
| १६ | काटई | ४०/६/१पै | ४०/६/अ | ०.१८७० | ०.०२७० |
| १७ | काटई | ४०/६/२ पै | ४०/६/ब | ०.१७७० | ०.११३४ |
| १८ | काटई | ४०/६/३ पै | ४०/६/क | ०.२१०० | ०.०१७५ |
| १९ | काटई | ४०/८ पै | ४०/८ पै | ०.५७२० | ०.२८९० |
| २० | काटई | ४०/११ पै | ४०/११ | ०.०५३० | ०.०२९० |
| २१ | काटई | ४१/३ पै | ४१/३ | ०.४२५० | ०.००२५ |
| २२ | काटई | ४१/४ पै | ४१/४ | ०.०९८० | ०.०९४० |
| २३ | काटई | ४१/५ पै | ४१/५ | ०.१०४० | ०.०३०० |
| २४ | काटई | ४१/६पै | ४१/६ | ०.०४८० | ०.००५० |
| २५ | काटई | ४१/७ पै | ४१/७ | ०.१४२० | ०.१४१० |
| २६ | काटई | ४१/८ पै | ४१/८ | ०.०८१० | ०.०२३६ |
| २७ | काटई | ७५/३/अ पै | ७५/३/अ पै | ०.९०७५ | ०.१९६८ |
| २८ | काटई | ७५/४ पै | ७५/४ | ०.१११० | ०.१०७५ |
| २९ | काटई | ७५/५ पै | ७५/५ | ०.१०६० | ०.०३६० |
| ३० | काटई | ७६/१ पै | ७६/१ | ०.३४६० | ०.१३२० |
| ३१ | काटई | ७६/२ पै | ७६/२ | ०.७१३० | ०.२३६० |
| ३२ | काटई | ७६/३/१ पै | ७६/३/अ | ०.१३२० | ०.०४७० |
| ३३ | काटई | ७६/३/२ पै | ७६/३ब | ०.२७१० | ०.०८२० |
| ३४ | काटई | ७६/३/३ पै | ७६/३/क | ०.०६३० | ०.०६३० |
| ३५ | काटई | ७६/४ पै | ७६/४/अ | ०.२९१० | ०.१६३० |
| ३६ | काटई | ७६/७ पै | ७६/७ | ०.३४४० | ०.०६५० |
| ३७ | काटई | ९१/१पै | ९१/१ | ०.२१०० | ०.०२०० |
| ३८ | काटई | ८९ पै | ८९ | ०.०४०० | ०.०१७८ |
| ३९ | काटई | ९०/१/१ पै | ९०/१/अ | ०.१७०० | ०.००४० |
| ४० | काटई | ९३ पै | ९३ पै | ०.४००० | ०.०३२३ |
| ४१ | काटई | ११३ पै | ११३ पै | ०.०१०० | ०.००२६ |
| **एकूण संपादित करावयाचे क्षेत्र** | | | | | **३.१५६६** |

## अनुसूची-दोन

## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाचे विवरण

| | |
|---|---|
| **प्रकल्पाचे नाव** | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या प्रस्तावित "ऐरोली-काटई रस्ता" या प्रकल्पाकरिता आवश्यक असलेल्या जमिनीचे भूसंपादन करणे. |
| **प्रकल्पाचे वर्णन** | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या प्रस्तावित "ऐरोली-काटई रस्ता" या प्रकल्पाकरिता आवश्यक असलेल्या जमिनीचे भूसंपादन करणे, या प्रकल्पात ठाणे जिल्ह्यातील कल्याण तालुक्यातील १ गावे समाविष्ट आहेत. त्या गावातील अंदाजित एकूण क्षेत्र ३.१५६६ हे.आर.आहे. |
| **समाजाला मिळणारे लाभ** | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या प्रस्तावित "ऐरोली-काटई रस्ता" या प्रकल्पाकरिता आवश्यक असलेल्या जमिनीचे भूसंपादन करणे या प्रकल्पामुळे सार्वजनिक दळणवळण बळकट होऊन प्रवासी वाहतुकीची संधी वृद्धींगत होऊ शकेल. |

## अनुसूची-तीन

## बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे

| अ. क्र | कारणे |
|---|---|
| १ | प्रकल्पाचे बांधकाम |
| २ | प्रकल्पाचे परिचालन |
| ३ | प्रकल्पाची देखभाल |

या कारणाकरिता जमिनीची आवश्यकता.

## अनुसूची-चार

## (सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अधिकाऱ्याने दिलेल्या सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश)

भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) यामध्ये कलम १०(क) समाविष्ट केले असून, त्यामध्ये अशी तरतूद केली आहे की, समुचित शासनाला जनहिताच्या दृष्टीने अधिसूचनेव्दारे, उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोन व प्रकरण तीन यांच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देता येते. त्यानुसार **महाराष्ट्र शासन राजपत्र** असाधारण भाग एक-कोकण विभागीय पुरवणी, असाधारण क्रमांक ७८, दिनांक ०७/०७/२०२४ अन्वये नुसार उक्त प्रकल्पाला जनहिताच्यादृष्टीने लोकहितकारी प्रकल्प असल्या कारणाने प्रकरण दोन आणि प्रकरण तीनच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देण्यात आली आहे.

ठाणे,

दिनांक :२३ जुलै, २०२६.

**वरुणकुमार सहारे,**

उप जिल्हाधिकारी (भूसंपादन),

मेट्रो सेंटर क्रमांक ३, ठाणे.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.